**नंदुरबार जिल्हयातील तापी नदीवरील मौजे सावळदा, अराळे व अमळथे तालुका नंदुरबार व मौजे कौठळ तसा. व कुऱ्हावद तसा. ता. शहादा जि. नंदुरबार येथील प्रस्तावित असलेल्या ०५ (पाच) वाळू घाटांची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे दि. १४/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

---

नंदुरबार जिल्हयातील तापी नदीवरील मौजे सावळदा, अराळे व अमळथे तालुका नंदुरबार व मौजे कौठळ तसा. व कुऱ्हावद तसा. ता. शहादा जि. नंदुरबार येथील प्रस्तावित असलेल्या ०५ (पाच) वाळू घाटांची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे दि. १४/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यात आली. त्यानुसार सदरील लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष मा. श्री. सुधिर खांदे, निवासी उप जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, नंदुरबार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

मा. सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ, यांच्या दि. १९/०१/२०२३ च्या कार्यालयीन आदेशानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा तर्फे सदस्य म्हणून प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नाशिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतू प्रादेशिक अधिकारी, नाशिक यांच्या पूर्व नियोजित कार्यक्रमामुळे ते हजर राहू शकणार नसल्याचे त्यांनी कळविले असल्याचे मा. अध्यक्ष यांना संयोजकानी सांगितले.

श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे यांनी दि. १४/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. नंदुरबार जिल्हयातील मौजे सावळदा, अराळे व अमळथे तालुका नंदुरबार व मौजे कौठळ तसा. व कुऱ्हावद तसा. ता. शहादा जि. नंदुरबार येथील प्रस्तावित असलेल्या ०५ (पाच) वाळू घाटांच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीसाठी समितीचे अध्यक्ष मा. श्री. सुधिर खांदे, निवासी उप जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, नंदुरबार, श्री. दिपक चव्हाण, जिल्हा खनिकर्म अधिकारी, नंदुरबार तसेच उपस्थित सर्व नागरिकांचे स्वागत केले.

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या अधिनियम, २००६ व सुधारित अधिसुचना दि. ०१/१२/२००९ मधील तरतुदी प्रमाणे वाळू घाटांच्या प्रकल्पास पर्यावरण अनुमती मिळण्याकरीता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे. नंदुरबार जिल्हयातील तापी नदीवरील मौजे सावळदा, अराळे व अमळथे तालुका नंदुरबार व मौजे कौठळ तसा. व कुऱ्हावद तसा. ता. शहादा जि. नंदुरबार येथील प्रस्तावित असलेल्या ०५ (पाच) वाळू घाटांची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. २१/१२/२०२२ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी, नंदुरबार यांचेकडून प्राप्त झाला. त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्या मान्यतेने दि. १४/०२/२०२३, रोजी जाहीर लोकसुनावणी आयोजित करण्याचे निश्चित केले. त्या अनुषंगाने याबाबतची जाहीर सुचना दि. ११/०१/२०२३ रोजी " दै. लोकमत" मराठी व " द टाईम्स ऑफ इंडिया" इंग्रजी या वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली.

तसेच केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या अधिनियम, २००६ व सुधारीत अधिसुचना दि. ०१/१२/२००९ मधील तरतुदी प्रमाणे सदर प्रकल्पाबाबतच्या पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रति मराठी व इंग्रजीत शासनाच्या जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार, जिल्हा परिषद कार्यालय नंदुरबार, जिल्हा उद्योग केंद्र, नंदुरबार, उपविभागीय कार्यालय नंदुरबार व शहादा, तहसिल कार्यालय, नंदुरबार व शहादा, ग्रामसेवक/ सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, सावळदा, अराळे व अमळथे तालुका नंदुरबार व मौजे कौठळ तसा. व कुऱ्हावद तसा. ता. शहादा जि. नंदुरबार, उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, नाशिक, या कार्यालयांमध्ये इच्छुक नागरिकांना अभ्यास करण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रस्तावित वाळू घाट प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रस्तावित वाळू प्रकल्पाविषयी व या प्रकल्पामुळे होणारा परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा व त्या अनुषंगाने माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे, याबाबत परिसरातील नागरिक, सामाजिक सस्थांचे प्रतिनिधी यांनी सदरच्या वाळू घाटांबाबत आक्षेप, सुचना, टिका-टिप्पणी तोंडी किंवा लेखी स्वरुपात (ईमेलव्दारे) कळवाव्यात हि विनंती करण्यात आली होती, त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार व उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे येथे सदर प्रकल्पाबाबत ईमेलव्दारे एकही हरकत/सुचना प्राप्त झालेली नाही.

पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीस खालील प्रमाणे नागरीक उपस्थित होते.

१. श्री. किरण भोजेसिंग गिरासे – आराळे
२. श्री. एम. एस. पवार – कौठळ तसा.
३. श्री. प्रदिप सुभाषसिंग गिरासे - आराळे
४. श्री. विजय के. यादव.

**श्री. प्रणव पाखले (संयोजक)** :- माननीय अध्यक्ष महोदय यांचे पूर्वपरवानगीने प्रकल्प प्रवर्तकास पीपीटीचे सादरीकरण करण्यासाठी विनंती केली.

**प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी** :- यांनी नंदुरबार जिल्हयातील मौजे सावळदा, अराळे व अमळथे तालुका नंदुरबार व मौजे कौठळ तसा. व कुऱ्हावद तसा. ता. शहादा जि. नंदुरबार येथील प्रस्तावित असलेल्या ०५ (पाच) वाळू घाटांच्या प्रकल्पाचे पीपीटी सादरीकरण केले.

जनसुनावणीचे संयोजक **श्री. प्रणव पाखले,** यांनी उपस्थितांपैकी कोणाला आपले विचार/ टिका टिपणी, आक्षेप असतील तर ते मांडावे असे आव्हान केले.

| अ. क्र. | उपस्थितांचे नाव व उपस्थित केलेले विचार/ टिका टिपणी, आक्षेप. | प्रकल्प प्रवर्तकाकडून करण्यात आलेला खुलासा |
|---|---|---|
| १ | **श्री. प्रदिप सुभाषसिंग गिरासे, आराळे -:**<br><br>१. बॅक वॉटरच्या पाण्यामुळे तापी नदी वरील आराळे वाळू घाट व्यापलेला असल्याने वाळू उपसा कसा करणार ?<br><br>२. वाळू उपसा संक्शन पंपाव्दारे केला जाईल का ?<br><br>३. वाळू वाहतुकीमुळे रस्ते खराब झाल्यास काय उपाययोजना करण्यात येतील. | **श्री. दिपक चव्हाण, जिल्हा खनिकर्म अधिकारी, नंदुरबार** :- यांनी सांगितले की,<br><br>१. सदर वाळू घाट मार्च अखेर कोरडा होण्यास सुरूवात होते. तरी त्या संदर्भात पुन्हा सिंचन विभागाकडून अहवाल प्राप्त करण्यात येईल व नदी पात्र कोरडे झाल्यावर वाळू उपसा करण्यात येईल.<br><br>२. वाळू उपसा यंत्राव्दारे (संक्शन पंपाव्दारे) न करता पारंपारिक पध्दतीने (कुदळ, फावडे इ.) केली जाईल.<br><br>३. जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत अशंतः निधी हा उपलब्ध करून देण्यात येईल. |

जनसुनावणीचे संयोजक श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, धुळे यांनी उपस्थित नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्यांची यथोचित नोंद घेण्यात आली असून त्यांचा समावेश जनसुनावणीच्या इतिवृत्तामध्ये केला जाईल, तदनंतर मा. अध्यक्षांनी उपस्थित नागरिकांचे आभार मानुन जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

Pakhale
27/2/23
**श्री. प्रणव पाखले**
संयोजक, जनसुनावणी समिती
तथा उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, धुळे.

27-2-2023
**श्री. सुधिर खांदे**
अध्यक्ष, जनसुनावणी समिती
तथा
निवासी उप-जिल्हाधिकारी तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी, नंदुरबार.